# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२ ०६०१, २२६९ ०६०२, २२६४ ११५०/५१, फॅक्स - २२६९ २१०२.
तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


**अधिसूचना**

क्रमांक:२अ/एडीएम/थेट द्वितीय वर्ष / २००९/2859
दिनांक : १९.९.२००९

विषय : शैक्षणिक वर्ष २००९-१० मधील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश संस्थास्तरावर करण्याबाबत

शैक्षणिक वर्ष २००९-१० मध्ये थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर शिल्लक राहिलेल्या जागा भरण्याबाबत प्रवेश नियमावलीतील ॲनेक्श्चर ३ मध्ये केलेल्या तरतूदी नमूद केलेल्या आहेत. तसेच **सदर प्रवेश संस्थास्तरावर कशा प्रकारे करावेत याबाबत ॲनेक्श्चर १ च्या स्टेज XI मध्ये विषद केले आहे.** तसेच थेट द्वितीय वर्ष पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमावलीत संस्थास्तरावर भरावयाच्या या जागा कशा प्रकारे भरता याबाबत सविस्तर सूचना ॲनेक्श्चर ३ बी ) I) मध्ये दिलेल्या आहेत.

त्यानुसार सदर जागा संस्थानी पूर्णतः पारदर्शकपणे आणि गुणवत्तेवर भराव्यात, शिल्लक जागांची माहिती संस्थेच्या सूचनाफलकावर आणि किमान २ वृत्तपत्रांत जाहिरात देऊन करावी , संचालनालयाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज केलेल्या व तीनही केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रवेश न मिळालेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी संस्थास्तरावर भरावयाच्या जागेसाठी संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे त्या यादीतील ज्या उमेदवारांचे अर्ज संस्थेकडे आलेले असतील त्यांची गुणवत्ता यादी तयार करून ती गुणवत्ता यादी उपयोगात आणून पूर्णपणे गुणवत्तेवर आधारीतच या जागा भरण्यात याव्यात .

**सदर प्रवेश अधिसूचना क्रमांक २अ/एडीएम/डीएसई-डीएसपी/२००९/२४२२, दिनांक १८.८.२००९ मध्ये दिलेल्या वेळापत्रकानुसार दिनांक २४.९.२००९ पर्यंत प्रवेश करण्यात यावेत. व प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या संकेतस्थळावर दिनांक २९.९.२००९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अपलोड करण्यात यावी.**

आपला,

( डॉ.एस.के महाजन )
प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

D:\Rajesh\Admission 09-10\DSE & DSPH\instiute level seat notification 19.9.2009.doc